# कचरा उचला; अन्यथा बांधकामे बंद

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

कचऱ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात अपयशी ठरलेल्या पुणे महापालिकेला मुंबई हायकोर्टाने सोमवारी फटकारले आणि तोडगा न काढल्यास शहरातील बांधकामांवर निर्बंध घालण्यात येतील, असा इशारा दिला. येत्या दोन दिवसांत कचरा निर्मूलनाबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश कोर्टाने दिले असून, त्यानंतर बांधकाम बंदीबाबत निर्णय घेण्यात येईल, असे संकेत देण्यात आले आहेत.



## सहाशे कोटींचा फटका

कोर्टाने शहरातील बांधकामांवर निर्बंध घालण्याचा कठोर निर्णय घेतल्यास पालिकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. बांधकाम परवानगी शुल्काद्वारे पालिकेला प्रतिवर्षी सुमारे पाचशे ते सहाशे कोटी रुपयांचे उत्पन्न प्राप्त होते. या उत्पन्नावर परिणाम होण्याची भीती आहे.

## मुंबई हायकोर्टाचा पुणे पालिकेला इशारा

शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची संपूर्ण विल्हेवाट लावण्यात पालिकेला अनेक वर्षांपासून अपयश येत असून, त्यावर ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याने विनित धांडा आणि नागरिक चेतना मंच यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली होती. न्या. अभय ओक आणि न्या. व्ही. एल. अचलिया यांच्या खंडपीठासमोर सोमवारी त्याबाबत सुनावणी झाली. घनकचरा व्यवस्थापनासंदर्भातील नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली नाही, तर पुण्यातही बांधकामांवर प्रतिबंध घालण्यात येतील, असे सूतोवाच खंडपीठाने या वेळी केले.

घनकचरा व्यवस्थापन कायद्यातील तरतुदींनुसार शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी त्याचे वर्गीकरण, गोळा करण्याची पद्धत, वाहतूक याबाबतचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. पुण्यात या निकषांची अंमलबजावणी होत नसल्याकडे कोर्टाचे लक्ष वेधण्यात आले होते. कोर्टाने त्याची गंभीर दखल घेतली असून, पालिकेला येत्या बुधवारपर्यंत (२ सप्टेंबर) त्याबाबत सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी मुदत दिली आहे.

घनकचरा व्यवस्थापन कायद्याच्या कडक अंमलबजावणीसाठी पालिका प्रयत्नशील असून, त्यादृष्टीने पालिकेतर्फे घेण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती कोर्टाला देण्यात येईल, अशी माहिती पालिकेचे वकील अभिजित कुलकर्णी यांनी खंडपीठाला दिली.

शहरातील कचऱ्याचा प्रश्न २००७ पासून अधिक जटील बनला आहे. पालिकेतर्फे उरळी-फुरसुंगी येथील कचरा डेपोत कचरा टाकण्यात येत असल्याने स्थानिक ग्रामस्थांतर्फे सातत्याने आंदोलन केले जात आहे. पालिकेने कचऱ्यावर प्रक्रियेसाठी प्रकल्प उभारले आहेत. तरीही समस्या कायम आहे.